प्रकरण सातवे

# समारोप

# समारोप

शिवाजी महाराजांच्या पश्चात मराठा राज्याचा कारभार सातार्‍यातून चालवला जात होता. तर पेशवाईच्या काळात तो पुण्याहून चालवला जात होता. पेशवाईच्या उत्तर काळातील पेशवे कर्तत्वशुन्य, सत्तालोलभ व स्वार्थी निघाले. त्यामुळे आपआपसात भांडण्यात धन्यता मांडणार्‍या भारतीयांना इंग्रजांनी आपल्या वर्चस्वाखाली आणले. मुठभर इंग्रजांनी अफाट अशा खंडप्राय देशावर १५० वर्षे राज्य कारभार केला.

कालांतराने इंग्रजांची गुलामगिरी भारतीयांना असह्य झाली. गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी त्यांनी विरोध करण्यास सुरवात केली. इंग्रजांना जसा देश पातळीवरून विरोध झाला. तसा तो जिल्हा व तालुका पातळीवरही झाला. यात सातारा जिल्हा व त्यातील वाळवा तालुका अग्रगण्य होता.

भारतीयांनी इंग्रजांशी १८५७ ला जो पहिला लढा दिला. त्यात सातारा जिल्ह्याचाही सहभाग होता. सातारा जिल्ह्यातील व सध्या सांगली जिल्ह्यात असणारा वाळवा तालुका हे एक केंद्र होते. तेथून सर्व हालचाली होत होत्या. १८५७ च्या उठांवानंतर अनेक वीर वाळवा तालुका व शिराळा पेठ्यात साधू बैराग्याच्या वेशात आश्रयास होते.

पुढे भारतीय असंतोषाला तोंड देण्यासाठी ह्यूमच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय काँग्रेस पक्षाची स्थापना झाली. लोकांच्यात राष्ट्रभक्तिची जाणीव निर्माण करण्याचे व इंग्रजां विरोधी वातावरण तयार करण्याचे काम वर्तमानपत्रांनी केले.

वाळवा तालुक्यात एकीकडे लोक जागृतीचे काम वर्तमानपत्रांनी केले. तर दुसरीकडे नेते मंडळींनी केले. आष्टा या गावचे गोविंदराव लिमये, हरिभाऊ तळवळकर इ.चा त्यात समावेश होता. पुणे येथे १२ मे १८९१ साली भरलेल्या चौथ्या प्रांतिक परिषदेचे अध्यक्षपद वाळवा तालुक्यातील गोविंदराव लिमये यांना मिळाले. काँग्रेसचे कार्य बहुजन समाजापर्यंत पोहचविण्याचे महत्त्वाचे कार्य लिमयेंनी केले.

१८८९ साली तालुक्यातील लोकांच्या अडीअडचंणीवर मात करणे. व काँग्रेस पक्षाचा गावोगावी प्रचार करणे यासाठी वाळवा छोटी काँग्रेसची स्थापना केली. वाळवा तालुक्यात त्याच्या एकंदर पाच सभा घेण्यात आल्या. १८९५ साली दुष्काळ व प्लेगची साथ यामुळे छोटी काँग्रेस मोडकळीस आली. एकंदरीत छोट्या काँग्रेस सभेमुळे काँग्रेस पक्षाचा भक्कम पाया घातला गेला. वाळवा तालुक्यात काँग्रेसचे नामवंत कार्यकर्ते तयार झाले.

वाळवा तालुक्यात आष्टा, कुरळूप, कासेगांव, वाटेगाव याठिकाणी गुंडांच्या टोळ्या कार्यरत होत्या. इंग्रजांनी त्यांना हाताशी धरून स्वातंत्र्य सैनिकांना बदनाम करण्याचा प्रयत्न केला. पण वाळवा तालुक्यातील स्वातंत्र्य सैनिकांनी वेळीच इंग्रजांची ही कुटील निती ओळखून प्रथम गुंडांचा बंदोबस्त केला.

१९११ साली इस्लामपूर येथे सत्यशोधक समाजाची स्थापना झाली. त्याद्वारे तालुकाभर अंध्दश्रध्दा निर्मुलन व शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्याचे काम केले. कासेगाव येथे डॉ. कुर्तकोटी यांनी स्वराजाच्या जागृतीची चळवळ चालवली. त्यामुळे राष्ट्रीय शिक्षणाला सहाय्य झाले.

इंग्रजांनी भारतीयांच्यात फुट पाडण्यासाठी प्रयत्न केले. पण त्याचा परिणाम सातारा जिल्हा व वाळवा तालुक्यावर कधीही झाला नाही. शेखकाका सारख्या मुस्लिम व्यक्तिचे नेतृत्व वाळवा व शिराळा पेठ्याला लाभले. तरीही अनेक मुस्लिम नेत्यांनी काँग्रेसच्या झेंड्याखाली एकत्रित काम केले.

स्वराज्य जागृतीसाठी म.गांधींनी देशभर दौरा केला. फेब्रुवारी १९२७ साली वाळवा तालुक्यातील इस्लामपूर व आष्टा या दोन गावांना भेटी दिल्या. दोन्ही ठिकाणी त्यांच्या प्रचंड मोठ्या सभा झाल्या. आष्टा नगरपालिकेने त्यांना मानपत्र व ३५० रुपयांची थैली अर्पण केली. गांधीजींच्या दौऱ्यामुळे वाळवा तालुक्यातील वातावरण काँग्रेसमय झाले.

कायदेभंग चळवळीचा एक भाग म्हणून सातारा जिल्ह्यात ३५ ठिकाणी जंगल सत्याग्रह करण्याचे नियोजन केले. २६ जानेवारी १९३० रोजी आष्टा येथे पूर्ण स्वातंत्र्य दिन

पाळण्यात आला. प्रभात फेऱ्या व झेंडा वंदनाचा कार्यक्रम राबवला. रेठरे धरण येथे ३१ ऑगस्ट १९३० ला जंगल सत्याग्रह यशस्वी केला. वाळव्यात विश्वनाथ देशपांडे यांच्या नेतृत्वाखाली परदेशी कपड्यांची होळी केली. तसेच बहिष्कार सप्ताह साजरा करून विविध कार्यक्रम राबवले.

१९३५ साली राजेंद्र प्रसाद यांनी साताराजिल्ह्याचा दौरा केला या दौऱ्यात रेठरे धरण तसेच इस्लामपूर येथे त्यांच्या सभा झाल्या. १९३५ ला वाळवा तालुक्यात काँग्रेसचा सुवर्ण महोत्सव साजरा करण्यात आला. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी ठिकठिकाणी ग्राम सफाई केली. अनिष्ट प्रथेविरुध्द लोकांत जागृती केली. काँग्रेसने वेळोवेळी केलेल्या ठरावांची माहिती लोकांना दिली.

१९४२ साली म.गांधींनी 'चले जाव, भारत छोडो' चा नारा पुकारला. 'करा अथवा मरा' असा संदेश भारतीयांना दिला. चले जाव चळवळीची घोषणा होताच सातारा जिल्हा व वाळवा तालुक्यात विद्युत वेगाने हालचाली सुरू झाल्या.

क्रांतीसिंह नाना पाटील हे महात्मा गांधींच्या स्वातंत्र्य लढ्यातील एक कोडे होते. महात्मा गांधींच्या सर्व लढा तंत्रात भूमिगत लढा कधीच नव्हता. पण क्रांतीसिंह नाना पाटील लढ्यात उतरले ते भूमिगत होवूनच. महात्मा गांधींनी सांगीतलेली एकच गोष्ट त्यांना माहीत होती ती म्हणजे इंग्लिश सत्ता या देशातून गेलीच पाहीजे. जंगल सत्याग्रहापासून वैयक्तिक सत्याग्रहा पर्यंत नाना पाटलांनी या तंत्राचा वापर केला.

इ.स. १९३० ते १९४२ या दहा बारा वर्षांच्या कालखंडात नाना पाटलांनी दक्षिण महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील लोकांत राजकीय जागृती घडवून आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. याशिवाय संघटना बांधणीच्या कार्याकडे लक्ष पुरवले. गावोगावी जावून लोकांना काँग्रेसच्या ध्येय धोरणांची व कार्याची माहीती करून द्यायची, गावातील-तरूणांना एकत्र करायचे, त्यांना राष्ट्रभक्तिचे धडे द्यायचे, त्यांच्यातील ध्येयवाद जागा करायचा,

त्यांना कृतीशील बनवायचे. अशा प्रकारे त्यांनी ग्रामीण भागात काँग्रेसची पाळेमुळे खोलवर रुजविली.

चलेजाव आंदोलनाच्या वेळी प्रति सरकारची स्थापना हा योगायोग मुळीच नव्हता. त्यासाठी आवश्यक ती पार्श्वभूमी आगोदर पासून तयार करण्यात आली होती आणि त्यामध्ये नाना पाटलांचा सिंहाचा वाटा होता.

नाना पाटलांच्या प्रतिसरकारने रचनात्मक कार्याची जबाबदारी समर्थपणे पार पाडली. त्यांनी स्वत:ची न्यायदान व्यवस्था निर्माण केली. गाव, गट व मध्यवर्ती कमिटी स्थापन करून यशस्वीपणे यंत्रणा उभी केली. सातारा जिल्ह्याच्या कांही भागांमध्ये क्रांतीसिंह नाना पाटलांनी ग्रामराज्याचा यशस्वी प्रयोग करून दाखवला. नाना पाटलांनी तब्बल ४४ महिने भूमिगत राहून मार्गदर्शन केले.

तसेच शिक्षकाची नोकरी सोडून बर्डे गुरूजींनी स्वातंत्र्य लढ्यामध्ये उडी घेतली. या लढ्यामध्ये ते अग्रभागी राहीले. स्वातंत्र्य सैनिक म्हणून त्यांनी पार पाडलेली कर्तव्ये फार मोठी आहेत. बिळाशी झेंडा सत्याग्रह, सोलापूर मार्शल लॉ, धारासना मिठ सत्याग्रह, मोटारी दिवसा लुटणे, समोरासमोर गोळीबार करणे अशी अनेक धाडसी कामे प्राणपणाने केली. कित्येक वेळा तुरूंगवास पत्कारावा लागला. १९४२ च्या आंदोलनात बर्डे गुरूजींनी आपल्या सहकाऱ्यांना एकत्र करून सशस्त्र उठाव केला. पोलीस पाटील, मुलकी पाटील यांचे राजीनामे घेतले, सरकारी शेतसारा भरण्याचे बंद केले.

स्वातंत्र्य लढ्याच्या काळात वाटेगाव भागात खुनी फराऱ्यांचे फार मोठे प्रस्थ होते. गुरूजींनी मोठ्या सामर्थ्यानीशी या लोकांचा बिमोड केला.

अच्युतराव पटवर्धन यांचे पत्र आणून १९४२ च्या क्रांतीचे विझवू पाहणारे निखारे देशभक्त बर्डे गुरूजींनी पुन्हा प्रज्वलीत केले.

क्रांतीवीर पांडू मास्तर यांनीही शिक्षकी पेशाचा त्याग करून स्वातंत्र्य लढ्यामध्ये उडी घेतली. प्रथम गावामध्ये व नंतर वाळवा तालुक्यातील इतर ठिकाणच्या लढ्यामध्ये

सामील झाले. आसपासच्या गावच्या जत्रेला पांडू मास्तर हजर राहून लोकांना स्वातंत्र्य लढ्यामध्ये सामील व्हा अशा पध्दतीने आवाहन करीत.

पांडू मास्तर कॉंग्रेसचे एक निष्ठावंत कार्यकर्ते होते. कॉंग्रेस पक्षाचा प्रचार करण्यात त्यांनी जिवाचे रान केले. त्यामध्ये कधी पायी तर कधी सायकलवरून प्रवास केला. १९४२ ला सप्टेंबर मध्ये निघालेल्या इस्लामपूर कचेरीवरील मोर्चाचे नेतृत्व पांडू मास्तर यांनी केले. त्यामध्ये त्यांना तुरूंगवास झाला. येरवडा तुरूंगातून पळून येण्याचे साहस या क्रांतीकारकाने दाखवले. नंतरच्या काळात त्यांनी भूमिगत राहून कार्य केले. त्यांनी दिलेले योगदान फार मोलाचे आहे.

सन १९४० सालापासून आजपर्यंत न थकता क्रांतीवीर नागनाथ नायकवडी जनतेच्या खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्यासाठी लढत आहेत. आझाद हिंद फौजेच्या शाखेची उभारणी करण्या करता नागनाथ आण्णांनी खूप कष्ट केले. निधीसाठी त्यांनी शेणोली जवळ पे-स्पेशल ट्रेन लूटली. १९४४ मध्ये धुळे खजीना लुटण्याचे फार मोठे साहस आण्णांनी केले होते. त्याच वर्षात त्यांनी सातारा जेलमधून पलायन केले. १९४५ मध्ये दिल्लीला जावून मनसासिंग व नानकसिंग या दोन आझाद हिंद फौजेतील फौजींना मार्गदर्शक म्हणून घेवून आले. जनतेला छळणाऱ्या गुंडांचा बदोबस्त त्यांनी केला. एक धाडसी क्रांतीविर म्हणून त्यांची ख्याती झाली होती.

रामचंद्र कृष्णाजी पाटील उर्फ चंद्रुजी कारभारी यांनी लोकांमध्ये जनजागृती करण्यासाठी सत्यशोधक तमाशा मंडळाची स्थापना केली. त्यांचे घर म्हणजे स्वातंत्र्य सैनिकांचे कार्यालय बनले होते. १९३७ साली पोटनिवडणूकीमध्ये ते बिनविरोध आमदार म्हणून निवडून आले. वैयक्तिक सत्याग्रहापासून तारा तोडणे, पोस्ट लुटणे, रेल्वे लुटणे इ. कामांमध्ये त्यांचा सहभाग होता. त्यांनी अनेक वेळा तुरूंगवास भोगला.

महात्मा गांधींच्या आदेशाप्रमाणे रंगराव दादा यांनी स्वराज्य प्राप्तीसाठी १९४२ च्या ''चले जाव'' चळवळीत सक्रीय सहभाग घेतला. पहाडी आवाजाने त्यांनी गावे पिंजून लोकजागृती केली. प्रभावी वक्तृत्वासाठी रंगराव दादा यांची ख्याती होती.

लक्ष्मण गणेश कुलकर्णी यांनी १९३० पासून चळवळीत सक्रिय भाग घेवून मातृभूमिच्या मुक्तिसाठी अतुलनीय कामगिरी केली. भूमिगत राहून बातम्या काढल्या ते अत्यंत कूशल होते. नियोजन व वेगवेगळ्या गटामध्ये एक सुत्रीपणा राखण्याचा फार मोठा यशस्वी प्रयत्न डी.जी. देशपांडे यांनी केला. १९४२ पासून ते १९४६ अखेर पकड वॉरंट होते. परंतू १९४२ पासून १९४३ अखेर ते कधीच पोलीसांच्या हाती लागले नाहीत. प्रतीसरकारच्या प्रत्येक कृती मध्ये त्यांचा सहभाग होता. पोलीसांना चकविण्यात ते पटाईत होते. बाबुजी पाटणकर म्हणजे एक झंझावाती नेतृत्व होते. पोलीस व दरोडेखोर त्यांच्याशी समोरासमोर लढणे, तारा तोडणे, पोस्ट लुटणे, पोलीसपाटलांचे राजीनामे घेणे इत्यादी प्रतिसरकारच्या कामामध्ये बाबुजी आघाडीवर होते.

स्वातंत्र लढयामध्ये वाळवा तालुक्यामध्ये स्त्रियांचाही प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरित्या सहभाग होता. राजुताई पाटील यांची कामगिरीतर अलौकिक होती. प्रतिसरकारमध्ये स्त्रियांचा सहभाग हा मुख्यतः निरोप पोहोचविणे भुमिगतांना आश्रय देणे, त्यांना जेवायला घालणे, गोपनिय माहिती मिळविणे इत्यादी स्वरूपाचे होते.

प्रति सरकारच्या चळवळीमध्ये स्त्रियांच्यात खास असे राजमती ताईंनी दारूबंदी, गांधीलग्न, दरोडेखोरांचा बिमोड व सावकारशाही विरोधी धोरण इत्यादी कामे केली. प्रति सरकारच्या चळवळीचा रोमहर्षक कालखंड हा स्त्रियांच्या सर्मपणाने भरलेला होता.

एकंदरीत पेशवाईचा अंत झाल्यापासून १९४२ अखेरच्या लढयापर्यंत वाळवा तालुक्यातून तीव्र प्रतिकार झाला. अगदी सामान्य माणूसही इंग्रज विरोधी लढयात सामील झाला. स्त्रियांनी ही आपल्यापरीने या लढयात खारीचा वाटा उचलला. सामान्यांनी नाटके, तमाशा, पोवाडे या व्दारेही इंग्रजांच्या विरोधी समाज जागृती केली. पण या सर्वांची नोंद

इतिहासात होवू शकली नाही . म्हणून मी या लघुशोध प्रबंधात वाळवा तालुक्यातील स्वातंत्र्य लढयाचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

थोडक्यात वाळवा तालुक्यातील स्वातंत्र चळवळ महत्वाची होती. या चळवळीतील नेते क्रांतीसिंह नाना पाटील, बर्डे गुरूजी, पांडू मास्तर, नागनाथ नायकवडी, चंद्रु कारभारी, डी. जी. देशपांडे, धन्वंतरी दादा, बाबुजी पाटणकर, रंगराव दादा पाटील, राजुमती पाटील, इंदुताई पाटणकर, पद्मावती कुलकर्णी, लक्ष्मीबाई नायकवडी इत्यादी स्वातंत्र्य सैनिकांचे जीवन चरित्र आणि त्यांचे भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील योगदान भावी पिढीस निश्चितच प्रेरणादायी व मार्गदर्शक ठरेल याबददल शंका नाही.